
युवा सकाळ
मंगळवार,
५ एप्रिल २००५

# लग्नाच्या बाजारात



वैजयंती जाधव,
कोल्हापूर.

एप्रिल आणि मे महिना लग्न सराईचे दिवस आहेत. कधी तरी अचानक एक फोन येतो आणि पलीकडची बोलणारी व्यक्ती सांगते आमच्या 'चिरंजीवाच किंवा कन्येचं लग्न ठरलं.' मग त्यावरची प्रतिक्रिया अत्यंत बोलकी असते. किंबहुना ती प्रतिक्रिया नसून प्रश्नच असतो, 'काय ठरलं?'

या दोनच शब्दांत मोठी आर्थिक, मानसिक आणि सामाजिक गुंतागुंत दडलेली मनाला जाणवते. लग्नाची ती प्राथमिक अवस्था असून देण्याघेण्याला यात अधिक महत्त्व असतं. मुलीकडच्यांना लग्नाचा खर्च बजेटमध्ये असावा, मुलाकडच्या मंडळींची मागणी 'यथायोग्य' असावी, असं वाटतं तर मुलाकडच्या मंडळींनाही बऱ्याचदा जमेल तेवढे वधू पक्षानं करावं, अगदीच जमनत नसेल तर आम्हीही मदत करू, असं वाटतं. अशा या सामंजस्य करारातून अनेक विवाह होत असले तरी आज विविध स्तरातून लग्नाचा बाजार मांडला गेला आहे, असं दिसतं. बरेच विवाह देण्याघेण्यावाचून अडलेले दिसतात. आज सुशिक्षित, प्रगल्भ समजली जाणारी पिढीही यात अडकलेली दिसते आहे. कधीतरी वर्षातून एकदा वर्तमानपत्राच्या एखाद्या पानावर बातमी येते की, 'अमूक अमूक' यांनी आपला विवाह नोंदणी पद्धतीने करून विवाह खर्च एखाद्या सामाजिक संस्थेला दिला.

या बातमीला संवेदनशील मन मुळात किती प्रतिसाद देतं? अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतपत लोक अशा व्यक्तीचं अभिनंदन करतात. या टप्प्यापर्यंत आपली विवाह संस्था पोहोचलेली दिसून येते; पण त्यामुळे विवाह संस्थेच्या या परंपरागत स्वरूपाला नाकारणारा युवा वर्ग मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे. किंबहुना पाश्चात्य देशातील विवाह पद्धती जी करारावर अवलंबून आहे तिथे इथे मूळ धरायला सुरवात तर केली नाही ना अशी भीती व्यक्त केली जात आहे. विवाहातील हे देणं-घेणं या आधुनिक पिढीला फारसं मान्य नाही. कारण त्यामुळं विचार जुळतीलच असं नाही. लग्न झाल्यावर मुलींनीच सासरी जायचं, मुलांकडच्या मंडळीची मन सांभाळायची. तिथं नवी नाती निर्माण करायची. आपले २०-२५ वर्षांचे सगळे पाश तोडून आम्हीच हे सारं का करायचं, असा प्रश्न इथली तरुणी विचारू लागली आहे. हे सारं करण्यापेक्षा आम्ही सक्षम आहोत, स्वावलंबी आहोत. त्यामुळे एकटंच राहणं पसंत करू असा तिचा मानस आहे. आणि इथच लग्नाच्या बाजारीकरणाला होणारा तिचा विरोध व्यक्त होतो आहे. मुलगी म्हणजे तडजोड या विचाराला छेद देण्याचा तिचा प्रयत्न आहे. स्वतःची काही नवी समीकरणं तिला मांडायची आहेत.

पारंपरिक मूल्ये कवटाळणाऱ्या समाजातील एका विशिष्ट वर्गाला हा निव्वळ मूर्खपणा आहे, असं जरी वाटलं तरी या आधुनिक विचारसरणीकडे गांभीर्याने पाहिलं पाहिजे. विवाहसंस्था समाजातील महत्त्वाची संस्था आहे. तिचा डोलारा जर नीट उभा राहायचा असेल तर असे लहान-मोठे धक्के पचवण्याची ताकद तिच्यात निर्माण केली पाहिजे. नवीन विचारांचं याठिकाणी स्वागत झालं पाहिजे. नव्याला जुन्याची जोड देऊन होणारे बदल विधायक कसे होतील यासाठी तरुण वर्गाने लक्ष पुरवणे गरजेचं आहे. केवळ जुन्याला विरोध अथवा आधुनिकतेचा खोटा कैवार घेऊन संघर्ष न होऊ देता लग्नाच्या बाजारीकरणाला थांबवणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.


केवळ कल्पनेच्या उंच भराऱ्या न घेता त्याला कृतिशीलतेची जोड द्यायला हवी. शाळा, महाविद्यालयीन स्तरावर अनेक कार्यक्रमात तरुण-तरुणी मोठ्या उत्साहानं 'हुंडा देणार नाही - हुंडा घेणार नाही' अशा शपथा घेताना दिसतात; पण यावर अंमलबजावणी होताना मात्र दिसत नाही. म्हणून आज याला कृतीची जोड देणे आवश्यक आहे. फक्त युवा पिढीनेच नव्हे तर समाजातील ज्येष्ठ वर्गानेही मानसिकता बदलली पाहिजे. तरुण वर्गाच्या नव्या संकल्पनांकडे दुर्लक्ष करून आता चालणार नाही. विज्ञानाचा एक नियम आपण लक्षात घेतला पाहिजे, जितक्या ताकदीने आपण एखादी गोष्ट दडपतो तितक्याच वेगाने ती वर येते. त्यामुळे नवीन विचारांचं स्वागत करून लग्न ठरल्यावर 'काय ठरलं?' या प्रश्नाला तिलांजली देण्याचा प्रयत्न करू या.

# हेलन केलरचा आदर्श

**अंध, मूक-बधिर अशा खचवून टाकणाऱ्या शारीरिक व्यंगावर मात करून अनेकांसाठी आदर्श ठरलेल्या हेलन केलर यांची जयंती नुकतीच झाली. त्याबद्दल...**

**वैजयंती जाधव,**
कोल्हापूर





**'माझ्यासंगे याल तर,**
**सांगेन तुम्हाला काही**
**जे मी वाचले आहे**
**या गूढ पाषाण लिपीत !'**

ओळखलं ही कविता कोणी लिहलीय? बरोबर आहे, ही कविता लिहिलीय हेलन केलर यांनी. 'दगडी भिंत' ही त्यांची कविता बरीच काही सांगून जाते. हेलन केलर आजच्या युवा पिढीला आदर्श ठरणारी अशी ही व्यक्ती केवळ स्वतःच्या विराण आणि विराट आयुष्याच नंदनवन करून त्यांच्या अंधःकारमय जीवनात प्रकाशाचा किरण पोचवणाऱ्या हेलन केलर यांचा आदर्श अतिशय महत्त्वाचा आहे.

१७४७ मध्ये 'दिदरी' नावाच्या फ्रेंच लेखकाने अंधांना शिक्षण देता येणे शक्य आहे. अशा आशयाचा एक लेख प्रसिद्ध केला. तेव्हा लोकांना अंधांच्या समस्येची जाणीव झाली. दिदरीनंतर व्हॅलेंटिन हॉय या फ्रेंच माणसाने लाकडातून कोरून काढलेल्या अक्षरांच्या साह्याने अंध मुलांना शिकवण्यास सुरवात केली. 'हॉय'ने नंतर उठावदार अक्षरे कागदावर छापून पुस्तके प्रसिद्ध केली व अंध मुलांसाठी शाळा काढली. त्याच्या प्रयत्नामुळे फक्त फ्रान्समध्ये नव्हे, तर अमेरिका आणि युरोपमध्ये शाळा काढण्यात आल्या. हॉयच्या शाळेत आलेल्या लुई ब्रेलला अंधांना वाचता कसे येईल या प्रश्नाची काळजी होती, तेव्हा त्याला कोणीतरी सांगितले की, सैनिकांना रणभूमीवर काळोखात वाचता यावे म्हणून कागदावर उचलेल्या टिंबाची एक लिपी वापरली जाते. तेव्हा लुईने प्रयोगाअंती दोन टिंबे रुंद आणि तीन टिंबे उंच अशा सहा टिंबांवर आधारलेली ब्रेल लिपी शोधून काढली. लुई ब्रेल प्रमाणे सॅम्युअल ग्रिडले हो याने अंधशाळेचे बारकाईने निरीक्षण करून बोस्टनमध्ये अशा प्रकारच्या एका शाळेत काम करावयास सुरवात केली. कर्नल हॉमस एच. पर्किन्स यांनी या शाळेचे यश पाहून एक भलीमोठी इमारत देणगी म्हणून दिली व या शाळेला 'पर्किन्स अंधशाळा' असे नाव देण्यात आले. या संस्थेत लॉरा ब्रिजमन ही सात वर्षांची आंधळी आणि बहिरी मुलगी दाखल झाली. तेव्हा शाळेचे मुख्याध्यापक 'डॉ. हो' यांनी उठावदार अक्षराचे शब्द तिच्यापुढे ठेवून तिला शब्दांची ओळख करून दिली. सुप्रसिद्ध लेखक चार्लस डिकन्सने याचा उल्लेख आपल्या 'अमेरिकन टिपणे' या पुस्तकात केला. हेलनच्या आईने तो उल्लेख वाचला आणि मग वेगाने घटनाचक्र सुरू झाले पर्किन्स अंधशाळेचे मायकेल ॲनॅग्रॉसनी आपली एक विद्यार्थिनी ॲन सलिव्हन हेलनसाठी शिक्षिका म्हणून पाठवली.

ॲनने हेलनचे संपूर्ण आयुष्यच बदलून टाकले. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण हेलनने ॲनच्या साह्याने पूर्ण केले. इतिहास, अंकगणित, प्राणिशास्त्र, भूगोल, वनस्पतीशास्त्र इत्यादी विषयाप्रमाणे जर्मन, लॅटीन, फ्रेंच इत्यादी भाषांचा तिचा अभ्यास गाढा होता. जर्मन ही हेलनची आवडती भाषा होती. हॉवर्ड युनिव्हर्सिटीशी संगलग्न असलेल्या रॅडक्लिफ कॉलेजची प्रवेश परीक्षा ती उत्तम गुण मिळवून पास झाली व आपल्या अव्यंग सहाध्यायांबरोबरच तिने आपले कॉलेजचे शिक्षण पूर्ण केले. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाला असताना 'माझी जीवनगाथा' हे हेलनचे स्वानुभवावर आधारित पुस्तक प्रसिद्ध झाले. हेलनचा त्यावेळी खास शिक्षकांकडून बोलण्याचा सराव सुरू होता. १९२७च्या ऑक्टोबर महिन्यात 'माझा धर्म' हे हेलनचे पुस्तक प्रकाशित झाले तसेच 'माझी जीवनकथा' या आत्मचरित्राचा उत्तरार्ध 'प्रवाहामध्ये' या पुस्तकातून प्रकाशित झाला. नंतरच्या काळात तिने ॲन सलिव्हन मेरी हिचे चरित्र 'माझ्या बाई' हे लिहिले. हेलन ही एक ध्येयवादी स्त्री असून समाजवादाकडे तिचा ओढा होता. महिलांच्या अंधाच्या समस्या, मताधिकार सामाजिक सुधारणा, जागतिक शांती हे तिच्या भाषमाचे विषय असत. हेलन केलर एक उत्कृष्ट अभिनेत्री होती. स्वतःच्या जीवनानुसार आधारित एका चित्रपटातही तिने काम केले. ए.एफ.बी. अंधासाठी स्थापन झालेल्या संस्थेसाठी फंड जमा करण्यासाठी हेलनने विविध दौरे काढले. आपण इतरांसाठी काम करतो ही भावना हेलनना अधिकाधिक उत्साहित करणारी होती. ए.एफ.बी. संस्थेत ग्रामोफोन आणि बोलकी पुस्तके यांचा अंधांना फुकट पुरवठा केला जाई. त्याचप्रमाणे शिक्षकांच्या ओठावर व गळ्यावर बोटे ठेवून अंध-बधिर मुले स्वरांची कंपने समजून घेत. पर्किन्स अंधशाळेतून अभ्यासक्रम पुरा केलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता इतर शाळांतून उत्तीर्ण झालेल्या मुलांपेक्षा कोणत्याही दृष्टीने कमी मानली जात नसे.

हेलन केलरने शेवटच्या क्षणापर्यंत अंधांसाठी आपले आयुष्य वेचले. विलक्षण जिद्द, चिकाटी, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हेलन केलरसारख अंध, मूक-बधिर महिलेने संपूर्ण अंध, मूक-बधिर मुलांच्या जीवनाच्या प्रगतीच्या वाटा सुखमय बनवल्या. मग आपल्यासारखी धडधाकट युवा पिढी त्यांच्या प्रगतीसाठी काय करू शकतो हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आजही समाजात मतिमंद मूल जर मूक-बधिर असेल, तर त्याच्या विकासासाठीचे प्रयत्न फारच अपुरे आहेत. त्याच्या कुटुंबातील लोकांचे, समाजातील व्यक्ती-संस्थांचे अज्ञान यामुळे या मुलांकडे फारसे लक्ष पुरवले जात नाही आणि आजची युवा पिढी तर अंध, मूक-बधिर अशा प्रश्नांकडे किती महत्त्वाचे पाहते, या गोष्टीवर मुलांचा विकास अवलंबून आहे. तरीही अंधांच्या ॲथलेटिक्स स्पर्धा, नोकरीसाठी त्यांना संधी अशा विविध क्षेत्रांत या लोकांनी प्रचंड अशी प्रगती केली आहे. वृत्तपत्रे, दूरदर्शन अशा माध्यमातून अंध, मूक-बधिर, अपंग, मतिमंद मुलांच्या समस्या समाजापर्यंत पोचत आहेत. चेतना विकास केंद्र सारख्या संस्था समाजातील अशा मुलांच्या विकासासाठी कार्यरत आहेत. कोल्हापूरमध्येही मूक-बधिर मुलांसाठी त्यांच्या विकासासाठी शाळा आहे.

प्रश्न फक्त एकच आहे, यात आपला सहभाग किती आहे? आपणाला या मुलांबद्दल केवळ सहानुभूती न वाटून देता त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण काय करतो? युवक, आजची युवती हा प्रश्न सोडवण्यासाठी किती गंभीरपणे पावले उचलत आहे. हेलनने म्हटल्याप्रमाणे न जाणो जर आपल्यालाही या गोष्टींचा सामना करावा लागला तर? चला तर मग हेलन केलरचाच आदर्श ठेवूया.

मंगळवार, ११ जानेवारी २००५

युवा सकाळ


# स्पर्धेचा चक्रव्यूह भेदण्याचे युवकांसमोर आव्हान

सध्याच्या प्रत्येक क्षेत्रातील जीवघेण्या स्पर्धेनं आजच्या युवा पिढीसमोर अनेक आव्हानं उभी केली आहेत. त्यामुळे स्पर्धेच्या चक्रव्यूहात युवा शक्ती अडकते की ते भेदून पलीकडेही जाते हे पाहणं गरजेचं आहे.

महाविद्यालयातील प्रवेशापासून नोकरी मिळेपर्यंतचा सारा स्पर्धा प्रवास तरुण- तरुणींना पार पाडावा लागतो. यशानं हरखून न जाता आणि अपयशानं खचून न जाता समोरची आव्हानं मोठ्या सामर्थ्यांनि त्याला पेलावी लागत आहेत. पण एक महत्त्वाची गोष्ट नजरेत येते ती आजच्या युवा पिढीपैकी किती जण स्पर्धेकडे गांभीर्याने पाहत आहेत?

डॉक्टर होण्यासाठी MH-CET, इंजिनिअर होण्यासाठीही CET द्यावी लागते. प्रशासनात जायचं असेल तर स्पर्धा परीक्षा, प्राध्यापक होण्यासाठी नेट-सेटची परीक्षा अशा परीक्षांचे चक्रव्यूह त्याला भेदायचे आहेत.

तरुण वयात घरातून मिळणारी गाडी, विनासायास मिळणारा मोबाईल अशा इंप्रेशन जमवण्यासाठी एक ना हजार वस्तू घरातून लाडाने पुरवल्या जातात. स्वच्छंदी, छानछोकी जीवन जगण्याचा आजच्या तरुण



वर्गाचा कल वाढत आहे. महाविद्यालयीन जीवन फक्त एंजॉय करण्याकडे सारे लक्ष आहे; पण नाण्याला दुसरी बाजूही आहे. दुसऱ्या बाजूला स्पर्धेचं भान असलेली, आयुष्याबद्दल सजग असणारी पिढी उज्ज्वल भविष्यासाठी रात्रंदिवस घाम गाळत आहे. उच्च दर्जाचं शिक्षण घेऊन उद्याचा भारत घडविण्याची ताकद त्यांच्या अंगी आहे. आज घालवलेले छानछोकी दिवस पुढील मार्गक्रमणात काटे ठरू नयेत म्हणून स्वप्न उराशी बाळगून युवक स्पर्धेत उतरत आहे. स्पर्धेत उतरताना जिद्द, नवीन काही तरी करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा मनाशी बाळगलेली दिसून येते.

पण स्पर्धेत दुर्दैवानं जेव्हा त्या अपयशाला सामोरं जावं लागतं तेव्हा महत्त्वाकांक्षी पिढी नैराश्याने ग्रासली जाते. यातून वेळीच बाहेर पडणं स्पर्धेची कसोटी आहे. या वेळी कुटुंबातून, मित्र परिवारातून त्याला मानसिक आधाराची गरज आहे; पण कधी कधी तो नेमका इथंच गफलत करतो आहे. नैराश्यावर मात करण्यासाठी पुरेसं मानसिक पाठबळ न मिळाल्याने स्पर्धेतून बाहेर पडण्याचे विचारही मनात डोकावू लागतात. यातूनही अनेक व्यक्तिगत, सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. दिवसेंदिवस पालकांवरील त्याचं अवलंबित्व वाढत आहे. याला काही अंशी पालकांची मानसिकता कारणीभूत आहे. पाश्चात्य देशांप्रमाणे भारतात नोकरी करून शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण खूप कमी आहे.

स्पर्धेचं भान त्याला ठेवावं लागणार आहे. आपण समाजाचा एक घटक या नात्याने त्याचंही काही देणं लागतो ही भावना युवकांनी बाळगली पाहिजे. कौटुंबिक, सामाजिक जबाबदारी ध्यानात घेऊन स्वतःचं भावी आयुष्य उज्ज्वल करण्यासाठी त्याला परिश्रम करणे गरजेचे आहे. स्वप्न साकार करण्याकरता महत्त्वाकांक्षेचे पंख आहेत. त्याचाच वापर करून त्यानं जर भरारी घेतली तर त्याचे व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक प्रश्न सोडवू शकेल.

**- वैजयंती जाधव**, कोल्हापूर

# भारतीय स्त्री : काल, आज आणि उद्या

**स्त्री** मुक्ती चळवळीच्या आद्यप्रणेत्या सावित्रीबाई फुले यांची जयंती नुकतीच अतिशय उत्साहाने साजरी करण्यात आली. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे, समाजाचा रोष पत्करून स्त्रियांच्या प्रगतीसाठी भारतातील पहिली मुलींची शाळा स्थापन करण्याचे सर्व श्रेय सावित्रीबाईकडे जाते. त्यांच्या या प्रयत्नामुळे केवळ आजची स्त्री समाजात उभी आहे. आजच्या २१ व्या शतकातील स्त्रीच्या प्रगतीचा आढावा घेण्याचा येथे प्रयत्न करण्यात आला आहे.

शासनाने गेले वर्ष महिला सक्षमीकरण म्हणून जाहीर केले. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवल्या आहेत. मुलांच्या नावापुढे आईचे नाव लावण्यास शासनाने संमती दिली आहे. पण हे जे सगळे निर्णय, उपक्रम आहेत ते प्रत्यक्षात किती राबवले जात आहेत? स्त्रियांची कालची, आजची आणि उद्याची घडणारी पिढी पाहता तिच्या समाजातील स्थानाचा विचार करणे अतिशय गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून विचार करताना असे दिसून येते, की गेल्या शतकातील स्त्रीची प्रगती फारशी समाधानकारक नव्हती. पण तरीही काही धडाडीच्या स्त्रिया स्वातंत्र्यपूर्व काळापासून आघाडीवर होत्या. ज्या काळात समाजातील टीकेला घाबरून स्त्रिया घराचा उंबरा ओलांडत नव्हत्या, त्या काळात म्हणजे सुमारे इ.स. १९३८ मध्ये स्वातंत्र्यसौदामिनी कॅप्टन लक्ष्मी सहगल यांनी मद्रास विद्यापीठातून वैद्यकीय क्षेत्रात एम.बी.बी.एस.ची पदवी घेतली. त्यांनी आझाद हिंद सेनेमधील जखमी जवानांवर उपचार केले. त्यानंतर स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी बावीस महिलांची पलटण तयार केली.
भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी याही एक महिलाच होत्या. पण पंतप्रधान पदाची जबाबदारी त्यांनी अतिशय समर्थपणे पार पाडली. म्हणजेच त्या काळातही धाडसी स्त्रियांनी समाजाला न घाबरता अन्यायकारक बंधने झुगारून दिली. रणरागिणी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्यापासून आजची कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी किरण बेदी यांच्यापर्यंत स्त्रियांच्या प्रगतीचा आलेख चढता राहिला आहे. एकविसाव्या शतकातील स्त्रिया राजकारण, लष्करी सेवा, संशोधन, कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, चित्रपट, संगीत, वाहतूक सेवा अशा अनेक क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखवून देत आहेत. लक्ष्मीबाई टिळक, सुचेता कृपलानी, सरोजिनी नायडू, मेधा पाटकर, रजिया पटेल, किरण बेदी यांनी आपण कोणत्याही क्षेत्रात मागे नाही, हे सिद्ध करून दाखविले आहे.

परंतु आजही ग्रामीण भागामध्ये स्त्रियांची स्थिती अतिशय गंभीर व भयावह आहे. ती केवळ चार भिंतींमध्ये चूल व मूल यामध्ये अडकून पडली आहे. अपुऱ्या वैद्यकीय सोयी, निरक्षरता, रूढी-परंपरा यामुळे स्त्रीचा दर्जा खालावला आहे. खेड्यापाड्यामध्ये एकूण श्रमापैकी ७० टक्के श्रम स्त्रिया करतात. कुटुंब व शेती अशा दोन्ही पद्धतीची कामे त्या पार पाडतात. स्त्रियांचा खालावलेला दर्जा उंचावण्यासाठी अनेक स्त्री संघटना स्त्रीमुक्ती चळवळीद्वारे प्रयत्नशील आहेत. परंतु स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे पुरुषांच्याच विरोधात काहीतरी, असा गैरसमज समाजात रुजत आहे. परंतु प्रत्यक्षात स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे स्त्रियांना त्यांच्यातील कलागुणांची, स्वत्वाची जाणीव करून देणे. त्यांना त्यांचे हक्क व पर्यायाने कर्तव्ये यांची सांगड घालून देणे. थोडक्यात तिला भयमुक्त करणे. आजकाल वृत्तपत्रांमधून बऱ्याचदा स्त्रीच्या हक्कांबद्दल, स्त्री-पुरुष समानतेबद्दल अग्रलेख येत असतात. त्यामध्ये स्त्रियांच्या प्रगतीतील अडसर म्हणून पुरुषी वर्चस्व कारणीभूत असल्याची टीका होते. पण सद्यःस्थितीमध्ये हे कितपत खरे आहे? बऱ्याचदा स्त्रियाच स्त्रियांच्या अधोगतीला जबाबदार असतात. पुरुषप्रधान संस्कृतीवर प्रत्येक वेळी टीका करणे म्हणजे स्त्रियांनी आपल्या कर्तव्यापासून दूर जाण्यासाठी तयार केलेली सोयीस्कर पळवाट, असे म्हणावे लागेल. आपल्या समाजात कोणत्याही नवीन घटनेकडे बघण्याचा दृष्टिकोन पारंपरिक असतो. 'संस्कृती' या गोंडस नावाखाली आपण पुराणमतवादी विचारांना चिकटून राहतो. त्यामुळेच मुलांच्या नावापुढे त्यांच्या आईचे नाव घालण्याचा उपक्रम क्वचितच आढळतो.

राज्य महिला आयोगसुद्धा समाजातील स्त्रीच्या स्थानाबद्दल गंभीरपणे विचार करत आहे. प्रसारमाध्यमातून स्त्रियांचे वाईट चित्रण करण्यास त्यांनी मनाई केली आहे. त्यामुळे स्त्रीची समाजात दुर्बल व दुय्यम दर्जाचा घटक अशी प्रतिमा तयार होते. तिच्याकडे उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले जाते. यावर उपाय म्हणून असे चित्रण करणाऱ्यांना दुर्योधन पुरस्काराने सन्मानित करण्याचे आयोगाने ठरवले आहे. काही देशांमध्ये स्त्री-पुरुषांना लष्करी शिक्षण सक्तीचे आहे. इस्राईलसारख्या देशातील युवती यामुळे स्वावलंबी बनल्या आहेत. तेथे स्त्रियांची चेष्टा, टिंगल, अत्याचार हे प्रकार बहुतांशी प्रमाणात बंद झाले आहेत. असा अनुभव भारतभेटीवर आलेल्या सिल्व्हिया एव्ह आल यांनी सांगितला. त्यांचे पूर्वायुष्य भारतात गेले असून सध्या त्या विमान वाहतूक कंपनीत काम करत आहेत. म्हणजेच स्त्रियांनी स्वतःची प्रगती स्वतःच साधली पाहिजे. समाजातील रूढी- परंपरांचे पालन योग्य त्या ठिकाणी डोळसपणे केले गेले पाहिजे. त्याचबरोबर अन्यायकारक बंधने झुगारून दिली पाहिजेत. तरच आजची स्त्री उद्या याहीपेक्षा आपली उत्तरोत्तर प्रगती साधेल. याच प्रगतीच्या प्रकाशाने मनाचा गाभारा उजळून निघेल. उद्याची शक्ती आजची सबला नारी तेव्हा गर्वाने मान ताठ करून म्हणेल,

'हम भारत देश की नारी
कर दिखायेंगे कुछ बाते न्यारी
सबके आगे, सबके उपर है हम
इसीलिए सदा करते है प्रयास हम.' ■

**वैजयंती जाधव,**
कोल्हापूर.

**पुणे शहरातील**
**शांत, प्रदुषणमुक्त परिसरात**
**घरकुल घेण्याची सुवर्णसंधी!**

फक्त १०% रक्कम भरून लगेच ताबा घ्या !
९०% पर्यंत वित्तसहाय्याची सोय*
बजेटप्रमाणे निवडीस भरपूर वाव :
कोरेगाव पार्क ■ कल्याणीनगर
विमाननगर ■ बोट क्लब रोड
बंडगार्डन ■ सॅलिसबरी पार्क ■ कोंढवा
शिवाजीनगर एक्स्टेंशन येथे.

४.५ लाखांपासून
४० लाखांपर्यंत
१/२/३/४ बीएचके
रेडी पझेशन
बजेट व आलिशान फ्लॅटस्
व्यवसायासाठी ऑफिसेस व शॉप्स् सुध्दा उपलब्ध.
*अटी लागू.

GERA
**गेरा डेव्हलपमेंटस् (प्रा.) लि.**
२००, गेरा प्लाझा, बोट क्लब रोड, पुणे - ४११००१.
टेलि : ९८२२०३७२८२, (०२०) ६१२५५८०/८१ फॅक्स : ६११३६५३
इ-मेल : sales@geraproperties.com वेबसाईट : www.geraproperties.com
**ESTABLISHED. RELIABLE. TRANSPARENT.**